## विषयसूची

卐 ग्रंथाचे संकलक आणि काही सूक्ष्म ज्ञानप्राप्तकर्ते साधक यांचा परिचय ६

卐 ‘दृष्ट’ या विषयाचे सामाईक मनोगत १०

卐 आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! १२

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] ‘*’ या चिन्हाने दर्शवले आहेत.)

१. ‘दृष्ट लागणे’ म्हणजे काय ? १५

२. दृष्ट लागण्याची सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया १६

३. दृष्ट लागण्याचे परिणाम किंवा दृष्ट लागली आहे, हे ओळखण्याची लक्षणे १८

४. ‘दृष्ट काढणे’ म्हणजे काय ? १९

५. दृष्ट काढल्याने होणारे लाभ २०

६. दृष्ट काढण्याच्या प्रक्रियेत भाव महत्त्वाचा २१

७. दृष्ट काढणाऱ्या व्यक्तीवर दृष्ट निघण्याची फलनिष्पत्ती अवलंबून असणे २२

८. दृष्ट काढण्याची पद्धत (केवळ कृती) २४

९. दृष्ट काढण्याच्या पद्धतीमागील शास्त्र आणि अनुभूती २७

* दृष्ट काढून झाल्यानंतर जातांना दृष्ट काढणाऱ्याने मागे वळून का पाहू नये ? २८

१०. दृष्ट काढण्यासाठी वापरले जाणारे घटक आणि त्यांद्वारे दृष्ट काढण्याच्या विविध पद्धती (मीठ, मोहरी, लाल मिरच्या, लिंबू, नारळ इत्यादी) ३१

* दृष्ट काढण्यासाठी मिठाचा वापर करण्याचे महत्त्व काय ? ३२

* दृष्ट काढण्यासाठी वापरायच्या तुरटीचा आकार कसा असावा ? ४८

**११. सतत साधना करणे, हाच दृष्ट न लागण्यावरचा खरा उपाय ६९**

**卐 काही आनुषंगिक सूत्रे ७०**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ७४**

## सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

卐 ग्रंथांतील ७० टक्के लिखाण हे अन्य संदर्भग्रंथांतील लिखाण, साधकांना सूक्ष्मातून मिळालेले ईश्वरी ज्ञान इत्यादी स्वरूपाचे आहे, तर ३० टक्के लिखाण ग्रंथांचे संकलक परात्पर गुरु डॉ. आठवले यांना गुरूंच्या आशीर्वादामुळे आतून स्फुरलेले आहे.

卐 अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी ‘का अन् कसे ?’ यांची शास्त्रीय उत्तरे !

卐 विज्ञानयुगातील वाचकांना सहज समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी सांगणे) ज्ञान !

卐 अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !

卐 साधनेविषयीचे तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !

## सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !

**मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे; मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे आणि ग्रंथांची संरचना ‘इन्डिझाईन’ या संगणकीय प्रणालीत करणे, या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा** – (०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com

## ‘दृष्ट’ या विषयाचे सामाईक मनोगत

बाळाला काजळाची तीट लावण्याचा संस्कार आजही जपला जातो. काही जुन्याजाणत्या स्त्रिया आलेल्या पाहुण्यावरून लिंबलोण आजही उतरवतात. परंपरा जेव्हा शतकानुशतके जपल्या जातात, तेव्हा त्यांमागे निश्चित काहीतरी शास्त्र असते, हे आपण समजून घ्यायला हवे.

सध्याच्या स्पर्धात्मक आणि भोगवादी युगात ईर्षा, द्वेषभाव, लोकेषणा, भिन्नलिंगी व्यक्तींकडे पहाण्याची वाईट दृष्टी यांसारख्या विकृतींनी बहुतांश व्यक्ती ग्रासलेल्या आहेत. या विकृतीजन्य रज-तमात्मक स्पंदनांचा त्रासदायक परिणाम सूक्ष्मातून नकळत दुसऱ्या व्यक्तींवर होतो. यालाच त्या व्यक्तींना ‘दृष्ट लागणे’ असे म्हणतात. तसेच कुटुंबात भांडणे, व्याधी, आर्थिक चणचण, वाईट स्वप्ने पडणे, नैराश्य, सिगारेट किंवा मद्य यांचे व्यसन यांसारख्या समस्या आता नित्याच्या झाल्या आहेत. जीवनातील ८० टक्के समस्यांमागील कारणे सकृद्दर्शनी स्थुलातील दिसत असली, तरी खरे मूळ कारण हे सूक्ष्मातील, म्हणजेच वाईट शक्तींचा त्रास, हे असते. वाईट शक्तींचा त्रास हाही दृष्ट लागण्याचाच प्रकार होय.

थोडक्यात, जीवन समस्यांरहित आणि आनंदी बनवायचे असेल, तर ‘दृष्ट काढणे’ हा सोपा घरगुती आध्यात्मिक उपाय अवलंबणे केव्हाही उपयुक्त ठरते. सध्याच्या विज्ञानयुगात वावरतांना ‘दृष्ट लागणे आणि दृष्ट काढणे’, हे शब्द उच्चारले, तरी बुद्धीजीवी लोक त्याला ‘पुरातन पद्धत’, असे हिणवून नाक मुरडतील. विज्ञानयुगात प्रत्येक गोष्ट शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडल्यास तिच्यावर लगेच विश्वास बसतो. त्यामुळे दृष्टविषयीच्या ३ खंडांत लागण्याची प्रक्रिया, विविध घटकांनी दृष्ट काढण्याच्या पद्धती, बाळाची दृष्ट काढण्याच्या सोप्या पद्धती, दृष्ट काढतांना घ्यावयाची काळजी इत्यादी विशद करतांना स्थूल माध्यमांतून न समजणाऱ्या गोष्टी ‘सूक्ष्म परीक्षणे’ आणि ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे’ यांद्वारे स्पष्ट केल्या आहेत.

सनातनचे साधक समष्टी साधना करून ‘ईश्वरी राज्य’ स्थापन

करण्यासाठी प्रयत्न करत आहेत, तर वाईट शक्ती ‘आसुरी राज्य’ स्थापन करण्यासाठी प्रयत्नरत आहेत. त्यामुळे वाईट शक्ती साधकांना विविध प्रकारे मोठ्या प्रमाणावर त्रास देतात. दृष्ट काढण्यापूर्वी असलेली साधकांची स्थिती, दृष्ट काढल्याने त्यांच्यावर झालेला परिणाम आणि त्यांना झालेले लाभ हे सनातनच्या साधकांना आलेल्या अनुभूतींतून मांडले असल्याने दृष्ट काढण्याची पद्धत शास्त्रशुद्ध असल्याचे सप्रमाण सिद्धही झाले आहे.

दृष्ट काढण्याचे महत्त्व लक्षात घेऊन अधिकाधिक जणांनी दृष्ट काढून स्वतःभोवती निर्माण झालेले त्रासदायक स्पंदनांचे आवरण दूर करावे आणि साधनेने ब्रह्मांडातील ईश्वरी लहरींचा लाभ करून घ्यावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावांआधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाच्या (नाडीभविष्याच्या) माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. १३.५.२०२० या दिवशी सप्तर्षींनी सांगितले, ‘यापुढे सद्‌गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ’ आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ’ असेच संबोधावे; कारण या नावांतून दोघींना देवीतत्त्व मिळेल, तसेच याचा लाभ त्यांच्या नावांचा उल्लेख करणाऱ्यांनाही होईल.’ सप्तर्षींच्या आज्ञेनुसार तसे संबोधणे चालू केले आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ‘‘श्रीसत्‌शक्ति’ ही भगवंताच्या शाश्वत स्वरूपाशी संबंधित आहे आणि ‘श्रीचित्‌शक्ति’ ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.’’

टीप ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.